Vol. 1, Issue II / March 2011, pp.89-93

Research Paper - History

# सोलापूरच्या पद्मशाली विणकर समाजाचा 'छोडोभारत' चळवळीतील सहभाग

- प्रा. अंबादास धर्मा केत
चा. ता. बोरा महाविद्यालय, शिरुर, जि. पुणे

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात १९४२ साली सुरु झालेल्या छोडो भारत चळवळीला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. ब्रिटीश सत्तेच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी भारतीय जनतेने दिलेला हा शेवटचा लढा होता. देशाच्या विविध प्रांतातील, सर्व स्तरांतील लोकांच्या सहभागामुळे या चळवळीला जनचळवळीचे स्वरुप प्राप्त झालेले दिसून येते.

## 'छोडोभारत' चा ठराव

१४ जुलै १९४२ रोजी राष्ट्रीय सभेच्या कार्यकारणीने वर्धा येथे भरलेल्या बैठकीत ब्रिटीशांनी ताबडबोब भारत सोडून जावे अन्यथा महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली व्यापक जनआंदोलन सुरु करण्यात येईल अशा आशयाचा ठराव संमत केला. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे भरलेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात वर्धा ठरावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. मुंबईच्या या ऐतिहासिक अधिवेशनात महात्मा गांधीजींना ब्रिटीशांना 'चले जाव' चा इशारा देताना भारतीय जनतेला 'करेंगे या मरेंगे' चा मंत्र दिला. मात्र सरकारने ही चळवळ दडपून टाकण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी सकाळीच महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरु, मौलाना आझाद यांच्यासह राष्ट्रीय सभेच्या ५४ प्रमुख नेत्यांना अटक केली.[१] त्यामुळे संपूर्ण देशभरात ब्रिटीशाविरुध्द संतापाची लाट उसळली. प्रक्षुब्ध झालेल्या सामान्य जनतेने स्वातंत्र्य चळवळ आपल्या हाती घेतली.

देशातील विविध प्रांतांप्रमाणेच महाराष्ट्रातही या चळवळीला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. बॉम्बस्फोटांची मोठी संख्या, विदर्भातील अष्टी -चिमुरच्या देश हादरवून टाकणाऱ्या घटना आणि सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकार या वैशिष्ट्यांमुळे १९४२ च्या चळवळीत महाराष्ट्र विशेष गाजला. महात्मा गांधी व राष्ट्रीय सभेच्या इतर नेत्यांना महाराष्ट्रातच स्थानबध्द करुन ठेवले होते. त्यामुळे या चळवळीत महाराष्ट्राला एक वेगळेच महत्व प्राप्त झाले होते.[२] महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, नाशिक, अहमदनगर आणि सातारा या जिल्ह्यांमध्ये ही चळवळ अधिक तीव्र स्वरुपाची होती.[३]

## सोलापूरातील पडसाद :

१९३० च्या सविनयकायदे भंगाच्या चळवळीच्या काळातील ऐतिहासिक कामगिरीप्रमाणेच १९४२ च्या या निर्वाणीच्या लढ्यातही सोलापूर शहर व जिल्ह्याचे योगदान वैशिष्ट्यपूर्ण राहीले आहे. देशातील प्रमुख राष्ट्रीय नेत्यांच्या अटकेनंतर सुरु झालेल्या छोडो भारत चळवळीचे तीव्र पडसाद स्वातंत्र्य प्रेरणेने भारलेल्या सोलापूरातील विद्यार्थी व तरुण कार्यकर्त्यामध्ये उमटणे साहजिकच होते.[४] राष्ट्रीय नेत्यांना अटक झाल्यानंतर सोलापूर शहर व जिल्हातील प्रमुख काँग्रेस पुढारी तुळशीदास जाधव , डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर , रामकृष्ण जाजू इत्यादींना गजाआड करण्यात आले. त्यामुळे राष्ट्रीय व स्थानिक नेत्यांच्या अटके बद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी सोलापूरातील विद्यार्थी, गिरणीकामगार यांनी एकत्र येऊन शाळा, महाविद्यालये व बाजारपेठा बंद करण्याच्या उद्देशाने सुभाष चौकातून निषेधाची प्रचंड मिरवणूक काढली.[५] ९ ऑगस्ट १९४२ ते ९ फेब्रुवारी १९४४ या काळात सोलापूर शहर व जिल्ह्यात सभा, निदर्शने, मिरवणूका, हरताळ इ. सनदशीर मार्गाबरोबरच बॉम्बस्फोट, सरकारी इमारती, पोलीस ठाणे व पोस्ट कार्यालयावरील हल्ले, रेल्वे रुळ उद्धस्त करणे अशा घातपाताच्या अनेक घटना घडल्या. औद्योगिक दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या सोलापूर शहरातील विद्यार्थी, महिला, विविध व्यावसायिकांच्या संघटना, गिरणी कामगार, हातमाग, यंत्रमाग उत्पादक व कामगार इ. समाजातील सर्व घटकांनी आपापल्या परिने या चळवळीत सहभाग घेतला. त्यामुळेच सोलापूरातही या चळवळीला जन चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले होते. अशा प्रकारच्या कोणत्याही जनचळवळीत अनेक जण पडद्याआड राहून अबोलपणे काम करीत असतात. सेतू बांधणाऱ्या श्रीरामाला मदत करणाऱ्या खारीसारखी ही माणसे असतात. इतिहासाच्या वाळवंटात त्यापैकी फार थोड्यांच्या पाऊलखुणा उमटत असल्यामुळे बरेच जण अज्ञात राहतात.[६] डॉ. य.दि.फडके यांच्या या मताप्रमाणे सोलापूर शहरातील पद्मशाली या पारंपारिक

हातमागाचा व्यवसाय करणाऱ्य विणकर समाजाचे छोडो भारत चळवळीतील कार्य वैशिष्ट्यपूर्ण परंतु दुर्लक्षित आहे.

**सोलापूरातील पद्मशाली समाज**

देशाच्या विविध भागातून व्यवसायाच्या निमित्ताने जे अनेक समाज महाराष्ट्रात आले त्यापैकी एक पद्मशाली समाज होय. हा समाज मूळ आंध्र प्रदेशातील तेलंगण प्रांतातील असून हातमागावर कापड विणणे हा त्यांच्या मुख्य व्यवसाय आहे. तेलंगण प्रांतातून स्थलांतरीत होऊन हा समाज प्रथमत: सोलापूरला स्थायिक झाला.[७] त्यानंतर आपल्या पारंपारिक व्यवसायाशी संबंधित असलेल्या मुंबई, पुणे, अहमदनगर, वसमत, जुन्नर इ. ठिकाणी हा समाज स्थिरावला. इतर शहरांपेक्षा सोलापूर शहरात पद्मशाली समाज मोठ्या प्रमाणावर आहे. आपल्या पारंपरिक हातमाग व्यवसायाला यंत्रमागाची जोड देऊन सोलापूर शहराची 'टेक्स्टाईल सिटी ' म्हणून ओळख निर्माण करण्यात या समाजाची महत्वाची भूमिका आहे. सोलापूरच्या आर्थिक क्षेत्राबरोबरच येथील राजकारण, समाजकारण, शिक्षण, संस्कृती या क्षेत्राशी या समाजाने आपले भावनात्मक नाते जोडले आहे.[८] त्यामुळेच महात्मा गांधीचे विचार व देशाची स्वातंत्र्य चळवळ यापासून हा समाज दूर राहू शकला नाही. महात्मा गांधीजींनी नेतृत्व केलेल्या प्रत्येक जनचळवळीत समाजातील कार्यकर्त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. समाजातील पापय्या उषण्णा कनकट्टी यांनी १९२० साली स्वदेशी व बहिष्कार आंदोलनात सक्रिय सहभाग घेऊन दारुच्या गुत्यावर पिकेटींग करण्यात पुढाकार घेतला होता.[९] १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनातील पद्मशाली समाजाचा सहभाग हा एक स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकेल तरीही आशण्णा इराबत्ती, मल्लय्या रामय्या पुल्ली, नारायणराव कन्ना, रामदास अन्नलदास, पापय्या कनकट्टी, नारायण कुचन, रामकृष्ण बुर्गूल या नेत्यांच्या प्रमुख सहभागाचा या संदर्भात केवळ उल्लेख करणेआवश्यक आहे.[१०] या ठिकाणी पद्मशाली समाजाच्या छोडोभारत चळवळीतील कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**सोलापूर शहरातील मिरवणूका व निदर्शने**

छोडोभारत चळवळीला सुरुवात झाल्यापासून म्हणजे ९ ऑगस्ट ते१३ ऑगस्ट पर्यंत शहरात रोज मिरवणूका काढण्यात आल्या व निदर्शने करण्यात आली. १० ऑगस्ट १९४२ या दिवशी शहरात अनेक ठिकाणी सभा घेण्यात आल्या व निदर्शने करण्यात आली.[११] साहजिकच याचे लोण पद्मशाली समाजाची वस्ती असलेल्या पूर्व भागात पसरले. समाजातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक आशण्णा इराबत्ती यांनी शहरातील ठिकठिकाणच्या सभांमध्ये जाहीर भाषणे दिली.[१२] नागप्पा व्यंकप्पा नारा यांनी या चळवळीच्या काळात बेकायदा मिरवणूक काढल्याबद्दल यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली होती.[१३] मार्कंडेय लच्चाप्पा बल्ला यांनी सभा व मिरवणूकांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्याबद्दल त्यांना ५ वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली होती.[१४] राजाराम विठोबा बुर्गूल यांनी सभा व मिरवणूकांना प्रोत्साहन देण्याबरोबरच या कार्यात पुढेराहून सहभाग घेतला होता.[१५] रामचंद्र मल्लय्या आंकम यांनी पूर्व विभागातील सभा व मिरवणूकांच्या आयोजनात पुढाकार घेतला होता.[१६] सोलापूर शहरातील सभा, मिरवणूका व हरताळ या माध्यमातून केल्या जाणाऱ्या आंदोलनात शहरातील पूर्व विभागातील सूत व्यापारी व कापड दुकानदार यांनी सर्व प्रकारची मदत केली होती. सभा मिरवणूकांच्या माध्यमातून संपूर्ण शहरातील वातावरण ब्रिटीशविरोधी बनलेहोते. या काळात शाळा व महाविद्यालयातील उपस्थितीही नगण्य होती.

**सत्याग्रहात पुढाकार**

महात्मा गांधीजींनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सामान्य माणसाच्या हाती सत्याग्रहाचे अभिनव तंत्र दिले. या तंत्राचा वापर छोडो भारत चळवळीच्या काळात सोलापूरातही मोठ्या प्रमाणात करण्यात आला. शहरातील प्रमुख नेत्यांच्या अटकेमुळे दिशाहीन व नेतृत्वहीन झालेल्या चळवळीला दिशा देण्यासाठी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे सत्याग्रहींची निवड करणे, सत्याग्रहाची प्रसिध्दी करणे, ठराविक ठिकाणी सत्याग्रह होणार आहे अशा मजकूराचा बोर्ड लावणे इ. कामे शहरातील तरुणांनी सुरु केली. राष्ट्रीय सण, राष्ट्रीय नेत्यांचे वाढदिवस या दिवशी सत्याग्रह केला जात असे. अशा प्रकारच्य सत्याग्रहात कामगार कार्यकर्त्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. पद्मशाली समाजाची मोठी वस्ती असलेल्या साखरपेठेतून मल्लप्पा कोंका आणि गोसकी यांनी या सत्याग्रहात सहभाग घेतला होता.[१७] विठोबा सिद्रामप्पा कोटा यांनी सत्याग्रहातील सहभागी कार्यकर्त्यांनी मदत केली होती.[१८]

**भूमिगत चळवळीतील सहभाग**

भूमिगत चळवळ हे छोडोभारत चळवळीचे एक महत्वाचे वैशिष्ट्य होते. राष्ट्रीय नेत्यांच्या आकस्मिक अटकेची प्रतिक्रिया म्हणून उफाळलेल्या जनतेच्या उत्साहाचे आणि शक्तीचे संघटन करुन सुनियोजित आंदोलन चालविण्याची गरज होती. ती

जबाबदारी अटक न झालेल्या काही काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या नेत्यांनी स्विकारली आणि ते भूमिगत झाले. देशातील भूमिगत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याचे आणि त्यांच्या घातपाताच्या कार्यात सुसुत्रता आणण्याचे काम समाजवादी नेत्यांनी केले. अच्युतराव पटवर्धन यांनी मुंबई येथे राहून महाराष्ट्र व कर्नाटक येथील भूमिगत चळवळीचे सुत्रे हलवली.[१९] सोलापूरातही भाई छन्नुसिंग चंदेले, भाई विभूतेव शंकरप्पा धनशेट्टी यांनी शहरातील प्रमुख कार्यकर्त्यानी एकत्रित आणून ब्रिटीशांविरुध्द संघटितरित्या दहशतवादी मार्गानेउठाव करण्यासंबंधी मार्गदर्शन केले.२० सत्याग्रहींना तुरुंगात पाठविणे, शाळा,महाविद्यालये हरताळ करणे, छोट्या मिरवणुका काढणे, बुलेटिन्स काढून वाटणे, बॉम्ब तयार करणे, शस्त्रांचा साठा करणे, निधी जमविणेइ. अनेक कामेसोलापूरातील भूमिगत नेत्यांनी केली.

या चळवळीच्या काळात पोलीसांच्या ससेमिऱ्याला दाद न देता सुरुवातीपासून शेवटपर्यंत चाललेला बुलेटिन्स काढणे हा एकमेव मार्ग होता. त्यामुळे लहानमोठी बुलेटिन्स काढून चळवळीची माहिति देणारी यंत्रणा भूमिगतांनी अनेक मोठ्या शहरात उभी केली होती. सोलापूरातही श्री बसवलिंगप्पा उंबरजे यांच्या घरात सायक्लोस्टाईल मशिनद्वारे बुलेटिन तयार केले जात.[२१] मुंबई व पुण्याहून येणारी चळवळीची इत्यंभूत माहिती असणारी पत्रके येत, ही पत्रके व स्थानिक बातम्या सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोचविण्याची यंत्रणा निर्माण केली होती. या यंत्रणेत पद्मशाली समाजातील अनेक कार्यकर्त्यांचा समावेश होता. आशण्णा इराबत्ती यांनी सन १९४२ ते१९४५ या काळात बुलेटिन्स वाटण्याचेकार्य केले.[२२] रामदास राजमल अन्नलदास यांना बुलेटिन्स वाटत असताना अटक करण्यात आली होती.[२३] याच चळवळीच्या संदर्भातील गुप्त साहित्यांच्या प्रसार कार्यात सहभाग घेतल्यामुळे नारायण भुमय्या आडम यांनी सहा महिने सक्तमजुरी व १०० रु. दंडाची शिक्षा झाली होती.[२४] रामचंद्र मल्लय्या अंकम यांचा बुलेटिन्सचे वाटप व भूमिगत कार्यकर्त्यांनी मदत करण्यात पुढाकार होता.[२५] १९३० च्या चळवळीत कोर्टजळीत प्रकरणात प्रमुख आरोपी असलेल्या नारायण तुकाराम कन्ना यांनी दोन वर्षेभूमिगत राहून बुलेटिन्स वाटणेव चळवळीचा जनतेत प्रचार करण्याचेमहत्वाचेकार्य केले.[२६] विठोबा कोटा,राजाराम बुर्गूल आणि पुंडलिक कोंका यांनीही भूमिगत राहून चळवळीच्या बातम्या लोकांपर्यंत पोचविण्याच्या कामी सतत प्रयत्न केले. इरप्पा नरसय्या बोल्ली यांनी बुलेटिन्स वाटण्याच्या कार्य करण्याबरोबर शहरातील तेलुगू वस्तीत घरोघरी हिंडून त्यांच्यात स्वातंत्र्यांची ज्योत प्रज्वलीत करण्याचेकार्य केले.[२७]

**घातपाती कृत्यातील सहभाग-**

छोडोभारत चळवळीच्या काळात संपूर्ण देशभरात घातपाताच्या अनेक घटना घडल्या. महाराष्ट्रातही बॉम्बस्फोट व सरकारी इमारतींवरील हल्ल्याच्या विविध घटनामंध्ये सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग राहिला. सोलापूर शहरातही अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट झाले.२८ शहरातील पोलीस स्टेशन, सरकारी इमारती, शाळा-महाविद्यालये व कापड गिरण्यांच्या परीसरात बॉम्बस्फोट करण्यात आले. याशिवाय टपालपेट्या जाळणे, पोस्ट कार्यालयावर हल्ला करणेइ. काही घटना घडल्या. अशा सर्व प्रकारच्या घातपाती कृत्यांमध्येही पद्मशाली समाजातील तरुणांनी हिरिरीने भाग घेतला. विठ्ठलराव बाळकृष्ण कोंडा यांचा बॉम्ब तयार करण्यासाठी लागणारे साहित्य गोळा करण्याच्या कामी पुढाकार होता.[२९] व्यंकप्पा चन्नापट्टण यांनी बॉम्ब तयार करुन शहराच्या निरनिराळ्या भागात पुरविण्याचेकाम केले. नारायण सिद्राम मड्डूर यांचा सरकारी मालमत्तेच्या मोडतोडीत व जाळपोळीच्या कार्यात सहभाग होता.[३०] नागप्पा व्यंकप्पा नारा यांना राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली सहा महिन्यांची शिक्षा झाली होती. या शिक्षेनंतर ते गुजरातमध्ये गेले. तेथेही त्यांनी रेल्वे उडविणे, गिरण्यांमध्ये लष्करासाठी ठेवलेल्या कापडाला आगी लावणेइ. धाडशी कृत्यात सहभाग घेऊन लाखो रुपयोंच लष्करी कापड जाळले. ही सर्व कामे ते अत्यंत शिताफीने व चलाखीने करीत त्यामुळे अनेक वेळा सापळा रचूनही तेइंग्रजांच्या हाती लागले नाहीत.[३१]

भूमिगत चळवळीच्या काळात संपूर्ण देशभरात सरकारची दळणवळण व संपर्क यंत्रणा उध्वस्त करण्यासाठ अनेक धाडशी कृत्ये करण्यात आली. त्यात पोस्ट कार्यालयावर हल्ला करण्याचे ५५० व पोस्ट कार्यालयेजाळण्याचे५० प्रकार देशभरात घडून आले.[३२] सोलापूर शहरातील चौपाड परीसरात असलेल्या पोस्ट कार्यालयातील टपालपेटीजवळ काही स्फोटक पदार्थ ठेवून पत्रपेटी जाळण्याचा प्रयत्न क रण्यात आला होता. त्यामुळे येथील पोस्ट कार्यालयाजवळ गुप्तपणे पोलीसांचा बंदोबस्त होता. त्याच दिवशी म्हणजे १४ ऑगस्ट १९४२ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास पोस्ट कार्यालय जाळण्याच्या उद्देशाने चार व्यक्ती आल्या, पोलीसांनी त्यांना पोस्ट कार्यालय जाळण्याच्या पूर्वीच पकडले.[३३] या चार व्यक्ती म्हणजे पद्मशाली समाजातील विशीत असणार`तरुण होते. त्यामध्ये लक्ष्मण आशण्णा इराबत्ती (वय१९), नारायण सिद्राम

मडूर (वय १९), मार्कंडेय लच्चाप्पा बल्ला(वय१८), नागनाथ व्यंकप्पा आयंची (वय१८) यांचा सहभाग होता.[३४] या तरुणा जवळ सापडलेल्या रॉकेलची बाटली, कापडाचे तुकडे व आगपेटी या वस्तूंमुळे ते पोस्ट कार्यालय जाळण्याच्या उद्देशाने आले होते. हे गृहीत धरुन सोलापूर सत्र न्यायाधिशाने भारतीय संरक्षण कायद्याप्रमाणे चौघांना दोषी ठरवून शिक्षा ठोठावली.[३५] त्यानुसार लक्ष्मण इराबत्ती व नारायण मडूर यांना प्रत्येकी पाच वर्षेसक्तमजुरी व रु.१००० दंड , दंड न भरल्यास ३ वर्षेसक्तमजुरी अशी शिक्षा ठोठावण्यात आली तर मार्कंडेय बल्ला व नागनाथ आयंची यांना प्रत्येकी पाच वर्षेसक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली.

**व्यंकप्पा चन्नापटण आणि मल्लय्या पुल्ली यांची कामगिरी-**

छोडो भारत चळवळीत व्यंकप्पा तिपण्णा चन्नापटण व मल्लय्या रामय्या पुल्ली या पद्मशाली नेत्यांची कामगिरी लक्षणीय ठरली. व्यंकप्पा चन्नापटण हे सोलापूरातील हातमाग उत्पादक व हातमाग धंद्याला लागणाऱ्या रंगाचे मोठे व्यापारी होते. १९३२ च्या झेंडा सत्याग्रहातील सहभागामुळे त्यांना ६ महिन्यांची शिक्षा व दंड करण्यात आला होता.[३६] त्यांनी १९४२ च्या चळवळीतही अत्यंत गुप्तपणे क्रांतीकार्य करीत सोलापूरातील हिरालालजी जोशी, बाबुराव गवळी व शिवलिंग दुधनी यांच्या सहाय्याने बेकायदा बुलेटिन्स काढून वाटण्याचे कार्य केले. दररोज दोन सत्याग्रही तयार करुन त्यांना बेकायदा प्रभातफेरी पाठविणे, बॉम्ब तयार करुन निरनिराळ्या भागात पुरविणे ही कामे सतत दोन वर्षेमोठ्या शिताफीने पार पाडली.[३७]

मल्लय्या पुल्ली हे सूत व रंगाचे व्यापारी व हातमाग व्यवसायातील उत्पादक होते. सोलापूरच्या राजकीय व सामाजिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग असे. सन १९४० ते १९४१ या वर्षात ते सोलापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष होते.[३८] १९३० च्या चळवळीप्रमाणेच १९४२ च्या चळवळीतील त्यांची कामगिरी महत्वाची आहे. भूमिगत क्रांतीकारांना आश्रय देणे, त्यांचा खर्च भागविणे, गुप्तपणे बुलेटिन्स तयार करुन ती वाटण्याची व्यवस्था करणेइ. कार्यात त्यांचा पुढाकार होता.[३९] त्यामुळेच ब्रिटीश सरकारने आक्षेपार्ह साहित्य बाळगल्याचा आरोप ठेवून त्यांना अटक केली. व एक सक्तमजुरी व ५०० रु. दंडाची शिक्षा ठोठावली.[४०] पुल्ली यांनी भारतीय संरक्षण कायद्याप्रमाणे दिलेल्या या शिक्षेचा निषेध म्हणून सोलापूर शहरातील सूताचे व्यापारी व रंगकाम व्यवसायिकांनी २६ फेब्रुवारी १९४३ रोजी शहरात हरताळ पाळला.[४१]

**इतर कार्यकर्त्यांचा सहभाग-**

पद्मशाली समाजातील कापड उत्पादक रंगाचे व्यापारी व सामान्य कामगार या सर्व घटकांनी आपापल्या कुवती प्रमाणे या चळवळीत वाटा उचलला होता. ९ ऑगस्ट १९४३ रोजी ऑगस्ट क्रांतीच्या पहिल्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने गांधीवादी नेते व कार्यकर्त्यांनी पुण्यातील आगाखान पॅलेस तुरुंगाकडे गांधीयात्रा, मोर्चे, सभा-मिरवणुका काढण्याचा कार्यक्रम आखला होता. त्या कार्यात सोलापूरचे पद्मशाली समाजातील लिंगराज सायण्णा कट्टा यांनी सहभाग घेतला होता. आगाखान पॅलेस येथे झालेल्या सभेत सक्रिय सहभाग घेतल्याबद्दल त्यांना एक महिना स्थानबध्द करण्यत आले होते.[४२] याशिवाय राजमल मल्लय्या गाजूल यांना या चळवळीतील सहभागाबद्दल एक वर्ष सक्तमजूरी व ५० रु. दंडाची शिक्षा झाली होती. ४३ १९४२ च्य चळवळीतील सक्रिय सहभागामुळे कृष्णाहरी लक्ष्मण गड्डम यांना त्याचे सहकारी चिन्नाप्पा आवाल, विठ्ठल बंडी यांच्यासह दीड वर्षे सक्तमजुरी व ५० रु. दंडाची शिक्षा झाली होती.[४४]

अशाप्रकारे सोलापूरासारख्या औद्योगिक दृष्ट्या आघाडीवर असलेल्या शहरातील विविध उद्योग व व्यवसायाशी संबंधीत असलेल्या कारागीर व व्यापारी जमातीपैकी पद्मशाली विणकर समाजाचा सोलापूर शहरावर फार मोठा प्रभाव दिसून येतो. देशाच्या विविध प्रदेशातून सोलापूरात येऊ न स्थायिक झालेल्या विणकरांमध्ये पद्मशालींची संख्या लक्षणीय आहे.[४५] साधारणपणे १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून सोलापूर शहरात वास्तव्य असलेल्या पद्मशाली समाजाचा येथील आर्थिक, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रावर प्रभाव राहीला आहे. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीच्या काळात सोलापूरात झालेल्या विविध आंदोलनापासून दूर न राहता हा समाज मोठ्या प्रमाणावर सहभागी झाला. १९४२ च्या चळवळीतही सभा, मिरवणूका, हरताळ या सनदशीर मार्गांबरोबरच घातपाताच्या कार्यक्रमामध्येही समाजाच्या कार्यकर्त्यांनी स्वत:ला झोकून दिले. समाजवाद्यांनी नेतृत्व केलेल्या भूमिगत चळवळीतील सक्रीय सहभागामुळे या समाजातील स्वातंत्र्य सैनिंकाना निरनिराळ्या शिक्षा भोगाव्या लागल्या. सोलापूरच्या पद्मशाली विणकर समाजातील कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेऊन आपल्या त्याग, कर्तृत्व व पराक्रमाने निर्माण केलेला इतिहास हा या कष्टकरी कारागीर समाजाच्या दृष्टीने गौरवशाली व तितकाच प्रेरणादायी आहे. सोलापूर शहरातील अशा विविध भाषिक व विभिन्न सांस्कृतिक परंपरा असलेल्या समाज घटकातील

लोकांच्या सहभागामुळे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात या शहराला व जिल्ह्याला एक विशेष मानाचे स्थान प्राप्त झालेआहे.

**संदर्भ व तळटीपा**


१) फडके य.दि. (डॉ.),विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड-५, श्री विद्या प्रकाशन , पुणे१९९७.पृ.६८.
२) केळकर श्रीपाद, छोडोभारत १९४२ कॉन्टीनन्टल प्रकाशन, पुणे२००३. पृ.२३०.
३) देसाई संजीव (डॉ.),(संपा.) कॅलेंडर ऑफ दि क्विट इंडिया, मुवमेंट इन दि बॉम्बेप्रेसिडेन्सी, डिपार्टमेंट ऑफ आरकाईव्हज् गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, बॉम्बे१९८५, प्रस्तावना पृ.९.
४) येवले शं. भा., सोलापूर जिल्हातील स्वातंत्र लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, १९९२,पृ.४१.
५) कित्ता, पृ. ४१-४२.
६) फडके य. दि. (डॉ.),पुर्वोक्त,पृ.११०.
७) सिंग के. एस. (संपा),पिपल ऑफ इंडिया - महाराष्ट्र पार्ट ३, व्हॉल्युम ३०, २००४, पृ.१६०९.
८) बोल्ली लक्ष्मीनारायण (डॉ.),एका साळीयाने, पद्मगंधा प्रकाशन , पुणे २००७.पृ. ८.
९) कुंटेभ. ग. (डॉ.),स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोष,म हाराष्ट्र राज्य पश्चिम विभाग, सोलापूर जिल्हा, खंड ३, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन , मुंबई, १९८०.पृ.४९२.
१०) अंदूरकर व्यं.गो., सोलापूर मार्शल लॉ आणि चार हुतात्मे, सोलापूर राष्ट्रीय साहित्य प्रकाशन समिती, सोलापूर. १९५८, पृ.१६६.
११) देसाई संजीव (डॉ.)(संपा.),पुर्वोक्त , पृ.६.
१२) कुंटेभ.ग. (डॉ.),पुर्वोक्त, पृ.४८९.
१३) कित्ता, पृ.५३९.
१४) कित्ता, पृ.५५०.
१५) कित्ता, पृ.५५५.
१६) कित्ता, पृ.४८८.
१७) येवलेशं.भा. पुर्वोक्त , पृ.४७.
१८) कुंटेभ.ग.(डॉ.),पुर्वोक्त, पृ.५०३.
१९) फडके य.दि. (डॉ.),पुर्वोक्त, पृ.७३.
२०) येवलेशं.भा. पुर्वोक्त , पृ.४२.
२१) कित्ता, पृ.४८५.
२२) कुंटेभ.ग. (डॉ.),पुर्वोक्त , पृ.४८९.
२३) कित्ता, पृ.४८५.
२४) कित्ता, पृ.४८७.
२५) कित्ता, पृ.४८८.
२६) कित्ता, पृ.४९३.
२७) बोल्ली लक्ष्मीनारायण ,पुर्वोक्त, पृ.६७.
२८) केळकर श्रीपाद, पुर्वोक्त, पृ.२४१.
२९) कुंटेभ.ग. (डॉ.),पुर्वोक्त , पृ.५०५.
३०) कित्ता, पृ.५६२,
३१) इराबत्ती आशण्णा , माझ्या आयुष्यातील टिपणे, सोलापूर १९७०, पृ.१३९.
३२) देसाई संजीव (डॉ.) (संपादक), पुर्वोक्त, प्रस्तावना पृ.११.
३३) कृष्णन भास्करन , क्विट इंडिया मुवमेंट -अ पीपल्स रिव्होल्ट इन महाराष्ट्र, हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई १९९९, पृ.२३६.
३४) इराबत्ती आशण्णा , पुर्वोक्त, पृ.१९०.
३५) कृष्णन भास्करन, पुर्वोक्त, पृ.२३६.
३६) कर्वेचि.ग., जोगळेकर स.आ.,जोशी य.गो. (संपा.), महाराष्ट्र परिचय अर्थात संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोष , खंड-२, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९५४, पृ.१८१.
३७) इराबत्ती आशण्णा , पुर्वोक्त, पृ.१२७.
३८) कुलकर्णी ग.प., सोलापूर नगरपालिका शतसंवत्सरिक ग्रंथ , सोलापूर नगरपालिका १९५३, परिशिष्ट १, पृ.२८,
३९) इराबत्ती आशण्णा , पुर्वोक्त, पृ.१०६.
४०) कर्वे चि.ग., जोगळेकर स.आ., जोशी य.गो. (संपा.), पुर्वोक्त, पृ.१५३.
४१) देसाई संजीव(डॉ.), (संपा.), पुर्वोक्त, पृ.२७९,
४२) कुंटेभ.ग. ,पुर्वोक्त, पृ.४९२ .
४३) कित्ता. पृ.५०९.
४४) येवलेशं.भा., पुर्वोक्त, पृ. ५१.
४५) १९४० साली सोलापूर शहरात आंध्र प्रदेश व कर्नाटकातून स्थलांतर केलेल्या व स्थानिक अशा विविध विणकर जातींचे वास्तव्य होते. अधिक तपशिलासाठी पहा - डॉ. आर.जी. काकडे- सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ व्हिविंग कम्युनिटीज् इन सोलापूर, गोखले इन्स्टिट्युट पब्लिकेशन, पुणे १९४६, पृ.१६७.